
# ३. ग्रामीण स्थानिक शासन संस्था

**३.१ ग्रामपंचायत**
**३.२ पंचायत समिती**
**३.३ जिल्हा परिषद**

समाजाचे नियमन करण्यात स्थानिक शासन संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात. आपल्या देशात या संस्थांबरोबरच संघशासन व राज्यशासनही समाजनियमनाच्या कामात सहभागी असते. स्थानिक शासन संस्थांचे ढोबळमानाने ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्था असे वर्गीकरण केले जाते. या पाठात आपण ग्रामीण भागातील स्थानिक शासन संस्थांविषयी जाणून घेऊया. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या ग्रामीण स्थानिक शासन संस्थांना एकत्रितपणे 'पंचायती राज्यव्यवस्था' म्हटले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**




आपल्या देशात तीन पातळ्यांवरून राज्यकारभार चालतो. संपूर्ण देशाचा राज्यकारभार संघशासन चालवते. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व चलन इत्यादी विषय संघशासनाच्या कक्षेत येतात. दुसऱ्या पातळीवर राज्यशासन असते. महाराष्ट्राचे राज्यशासन कायदा, सुव्यवस्था, आरोग्य, शिक्षण यांच्यासंबंधी कायदे करते. तिसऱ्या पातळीवर स्थानिक शासन संस्था असतात. ग्रामीण भागातील स्थानिक शासन संस्थांना 'पंचायती राज्य व्यवस्था' म्हणतात.

**स्थानिक शासन संस्था**

| **ग्रामीण** | **शहरी** |
|---|---|
| ग्रामपंचायत | नगरपंचायत |
| पंचायत समिती | नगरपरिषद |
| जिल्हा परिषद | महानगरपालिका |

## ३.१ ग्रामपंचायत

प्रत्येक गावाचा कारभार ग्रामपंचायत करते. पाचशेपेक्षा कमी लोकसंख्या आहे अशा दोन किंवा अधिक गावांसाठी एकच ग्रामपंचायत असते. तिला 'गट ग्रामपंचायत' म्हणतात. पाणीपुरवठा, दिवाबत्ती, जन्म-मृत्यू, विवाहाच्या नोंदी इत्यादी कामे ग्रामपंचायत करते.

### ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व अधिकारी :

**सरपंच :** ग्रामपंचायतीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले सदस्य आपल्यापैकी एकाची सरपंच आणि एकाची उपसरपंच म्हणून निवड करतात. ग्रामपंचायतीच्या सभा सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होतात. गावाच्या विकास योजना प्रत्यक्ष राबवण्याची जबाबदारी सरपंचावर असते. योग्य पद्धतीने कारभार न करणाऱ्या सरपंचावर ग्रामपंचायतीच्या सदस्यांना अविश्वासाचा ठराव मांडता येतो. सरपंच उपस्थित नसेल तेव्हा ग्रामपंचायतीचे कामकाज उपसरपंच पाहतो.

**ग्रामसेवक :** ग्रामसेवक ग्रामपंचायतीचा सचिव असतो. त्याची नेमणूक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करतात. ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज पाहणे, ग्रामपंचायतीच्या विकास योजना गावातील लोकांना समजावून सांगणे इत्यादी कामे ग्रामसेवक करतो.


**ग्रामसभा :** ग्रामीण भागात किंवा गावात राहणाऱ्या मतदारांची सभा म्हणजे ग्रामसभा. ग्रामसभा हे स्थानिक पातळीवरील लोकांचे सर्वांत महत्त्वाचे संघटन होय.


प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान सहा सभा होणे बंधनकारक आहे. ग्रामसभा बोलावण्याची जबाबदारी सरपंचावर असते. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या सभेत ग्रामपंचायतीने सादर केलेला वार्षिक अहवाल आणि हिशोबावर ग्रामसभा चर्चा करते. ग्रामसभेच्या सूचना ग्रामपंचायतीला कळवल्या जातात.

ग्रामपंचायतीच्या विकास योजनांना ग्रामसभा मान्यता देते. शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यास कोणत्या व्यक्ती पात्र आहेत ते ठरवण्याचा अधिकार ग्रामसभेला असतो.

**ग्रामसभेत महिलांचा सहभाग :** ग्रामसभेच्या बैठकीपूर्वी गावातील महिलांची सभा होते. तिथे महिला अधिक मोकळेपणाने वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा करतात. पिण्याचे पाणी, दारूबंदी, रोजगार, इंधन, आरोग्य इत्यादी विषयांबाबत महिला ग्रामसभेत अधिक आस्थेने बोलतात. आवश्यक ते बदल घडवण्यासाठी उपायही सुचवतात.

**ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने :** गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायत अनेक योजना व उपक्रम राबवते. त्यासाठी ग्रामपंचायतीजवळ पैसा असणे आवश्यक आहे. विविध करांची आकारणी करून ग्रामपंचायत पैसा उभा करते.








## ३.२ पंचायत समिती

एका तालुक्यातील सर्व गावांचा एकत्रित असा विकासगट असतो. विकासगटाचा कारभार पाहणारी संस्था म्हणजे पंचायत समिती होय. ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांना जोडणारा दुवा पंचायत समिती असते.

**पंचायत समितीचे पदाधिकारी :** पंचायत समितीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची सभापती आणि एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. पंचायत समितीच्या सभा बोलावणे आणि सभांचे कामकाज चालवणे ही जबाबदारी सभापतीची असते. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती काम पाहतो.

## पंचायत समितीची कामे




विकास गटात कोणती कामे केली पाहिजेत, त्या योजनांचा आराखडा पंचायत समिती तयार करते. प्रत्येक महिन्यात पंचायत समितीची किमान एक तरी सभा होणे आवश्यक असते.

पंचायत समितीला जिल्हा निधीतून काही रक्कम मिळते. विकास गटात करायच्या विकासाच्या योजनांसाठी पंचायत समितीला राज्यशासनाकडूनही अनुदान मिळते.

## ३.३ जिल्हा परिषद

प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा परिषद असते. महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे आहेत परंतु जिल्हा परिषदा मात्र ३४ आहेत. कारण मुंबई (शहर) जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा हे ग्रामीण लोकवस्तीचे भाग नाहीत म्हणून त्यांच्यासाठी जिल्हा परिषदा नाहीत.

**जिल्हा परिषदेचे पदाधिकारी :** जिल्हा परिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात.

जिल्हा परिषदेच्या सभांचे अध्यक्षपद जिल्हा परिषद अध्यक्षाकडे असते. सभांचे कामकाज त्याच्या नियंत्रणाखाली चालते. जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहारांवर अध्यक्षाचे नियंत्रण असते.

जिल्हा परिषदेच्या निधीतून योग्य तो खर्च करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला असतो. अध्यक्षाच्या गैरहजेरीत ही सर्व कामे उपाध्यक्ष पार पाडतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**जिल्हा परिषदेचा कारभार कसा चालतो ?**


जिल्हा परिषदेचा कारभार विविध समित्यांमार्फत चालवला जातो. वित्त समिती, कृषी समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती इत्यादी. महिला व बालकल्याण समिती महिलांचे आणि बालकांचे प्रश्न विचारात घेते.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :** जिल्हा परिषदेने घेतलेल्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. त्याची नेमणूक राज्यशासन करते.


### तुम्ही काय कराल ?

कल्पना करा, तुम्ही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहात. तुमच्या जिल्ह्यात तुम्ही कोणत्या विकास कामांना प्राधान्य द्याल ?


## जिल्हा परिषदेची कामे



शिक्षणविषयक सुविधा




आरोग्यविषयक सुविधा



पाणीपुरवठा




बी–बियाणांचा पुरवठा



दिवाबत्तीची सोय



गावाच्या परिसरात झाडे लावणे

**काय कराल ?**

दिनेश आणि नयनाला खालील गोष्टी मिळवण्यासाठी कोठे जायला सांगाल ?

- छोट्या भावंडाच्या लसीकरणासाठी ......... .
- वडिलांबरोबर ७/१२ (सात बाराचा) उतारा आणण्यासाठी ................. .
- नव्या खताचा वापर करण्याविषयी माहिती मिळवण्यासाठी ................. .
- अशुद्ध पाणीपुरवठ्याच्या विरोधात तक्रार करण्यासाठी ................. .
- जन्माचा दाखला मिळवण्यासाठी ........... .
- उत्पन्नाचा / जातीचा दाखला मिळवण्यासाठी ................. .

**माहीत आहे का तुम्हांला ?**

१९९२ मध्ये ७३ व ७४ वी संविधान दुरुस्ती झाली. या दुरुस्तीने ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्थांना संविधानात स्थान दिले. परिसराचा विकास कार्यक्षमरीतीने करण्यासाठी त्यांच्या अधिकारात वाढ केली. त्यांच्या अखत्यारीतील विषयही वाढवले. त्यांना प्रभावीपणे काम करता यावे म्हणून त्यांच्या आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवले.

**पंचायत राज्यव्यवस्था – एका दृष्टिक्षेपात**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | ← | जिल्हा परिषद | → | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| सभापती | ← | पंचायत समिती | → | गटविकास अधिकारी |
| सरपंच | ← | ग्रामपंचायत | → | ग्रामसेवक |
| ↓ | | | | ↓ |
| मतदानाद्वारे निवडले जातात. | | | | राज्यशासनाकडून नेमले जातात. |

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**निवडणूक कोण लढवू शकते ?**

ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही शासन संस्थांमध्ये निवडून येण्यासाठी काही पात्रतेच्या अटी पूर्ण कराव्या लागतात. उदा., निवडणूक लढवणारी व्यक्ती भारताची नागरिक असावी. तिचे वय २१ वर्षे पूर्ण असावे. स्थानिक मतदारयादीत त्या व्यक्तीचे नाव समाविष्ट असावे. पात्रतेच्या या अटी शहरी स्थानिक शासन संस्थांनाही लागू आहेत.

## स्थानिक शासन संस्था – ग्रामीण

| ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
|---|---|---|

**सदस्य संख्या**


| ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
|---|---|---|
| किमान ७<br>कमाल १७ | किमान १५<br>कमाल ४५ | किमान ५०<br>कमाल ७५ |

**पदाधिकारी**

| ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
|---|---|---|
| सरपंच<br>उपसरपंच | सभापती<br>उपसभापती | अध्यक्ष<br>उपाध्यक्ष |

**अधिकारी**

| ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
|---|---|---|
| ग्रामसेवक | गटविकास अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |



## स्वाध्याय

**१. योग्य पर्यायासमोर (✓) अशी खूण करा.**

(१) प्रत्येक गावाचा स्थानिक कारभार ..........करते.

ग्रामपंचायत ☐ पंचायत समिती ☐ जिल्हा परिषद ☐

(२) प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान ........... सभा होणे बंधनकारक असते.

चार ☐ पाच ☐ सहा ☐

(३) महाराष्ट्रात सध्या .............जिल्हे आहेत.

३४ ☐ ३५ ☐ ३६ ☐

**२. यादी तयार करा.**

पंचायत समितीची कामे.

**३. तुम्हांला काय वाटते ते सांगा.**

(१) ग्रामपंचायत विविध कर आकारते.

(२) महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यांच्या संख्येपेक्षा जिल्हा परिषदांची संख्या कमी आहे.

**४. तक्ता पूर्ण करा.**

माझा तालुका, माझी पंचायत समिती

(१) तालुक्याचे नाव ............. .

(२) पंचायत समिती सभापतीचे नाव............. .

(३) पंचायत समिती उपसभापतीचे नाव............. .

(४) गटविकास अधिकाऱ्याचे नाव ............. .

(५) गटशिक्षण अधिकाऱ्याचे नाव............. .

**५. थोडक्यात माहिती लिहा.**

(१) सरपंच

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी

**उपक्रम**

(१) अभिरूप ग्रामसभेचे आयोजन करून सरपंच, सदस्य, नागरिक, ग्रामसेवक या भूमिका वठवा.

(२) बालसंसदेची रचना स्पष्ट करणारा तक्ता तयार करा व वर्गात दर्शनी भागात लावा.

(३) तुमच्या परिसरातील किंवा शहरानजीकच्या जिल्हा परिषदेच्या योजनांची माहिती मिळवा.

✻ ✻ ✻

E7GAVI